<u>नियमीत दिवाणी दावा क्र.११२८/२०२२ मधील निशाणी क्र.४४ वरील आदेश</u>

(CNR No.MHBI11-003303-2022)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचे विरुध्द नि.क्र.१ खाली झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ चे असे कथन आहे की, त्यांना लेखी कैफियत दाखल करणेकामी आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्याने ते त्यांची लेखी कैफियत मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत. वादग्रस्त मिळकतीमध्ये प्रतिवादींचे हितसंबंध गुंतलेले आहेत त्यामुळे त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर असणे गरजेचे आहे. तरी त्यांचे विरुध्द नि.क्र.१ खाली झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द करण्यात येवून त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. वादींनी अर्जाचे मागील बाजूस म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी विलंबाबाबत कोणतेही सयुक्तीक कारण दिलेले नाही व त्या पुष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा देखील दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व २ यांचेवर दि.२१/०२/२०२३ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झाली, ज्यास अनुसरुन ते विधीज्ञांमार्फत न्यायालयासमोर हजर झाले. परंतु त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम-८, नियम-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपली कैफियत दाखल केली नाही. परिणामास्तव, दि.२७/०३/२०२४ रोजी नि.क्र.१ खाली प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द दावा 'विना कैफियत' चालविणेबाबतचा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर प्रस्तुत अर्ज दि.१४/१०/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

६. प्रतिवादी क्र.१ व २ चे कथनांनुसार, त्यांना लेखी कैफियत दाखल करणेकामी आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्याने ते त्यांची लेखी कैफियत मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत. विना कैफियत आदेश रद्द होऊन मिळण्याकरिता प्रतिवादींनी दिलेले उपरोक्त कारण दाव्याचे स्वरुप विचारात घेता सयुक्तिक आहे, कारण प्रस्तुत दावा हा वाटपासाठी व स्वतंत्र

ताबा मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ व २ यांची कैफियत अभिलेखावर घेतली नाही तर दावा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. तसेच नैसर्गिक न्यायाचे तत्वानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे योग्य ठरेल. करिता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तथापि, अर्ज मंजूर करताना झालेल्या विलंबाकरिता प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीस एकुण खर्च रु.३००/- देणेबाबत आदेशीत करणे योग्य होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द दि.२७/०३/२०२४ रोजी नि.क्र.१ खाली झालेला 'विना कैफियत' चा आदेश त्यांनी वादींना एकुण खर्च रु.३००/- (तीनशे रुपये मात्र) देण्याचे अटीवर रद्यबातल करण्यात येतो.

३) वरील आदेश क्र.२ ची पूर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

MOMIN HANIF MOINUDDIN

Digitally signed by MOMIN HANIF MOINUDDIN
Date: 2025.11.27 17:14:51 +0530

दिनांक : २७/११/२०२५

**( एच.एम. मोमीन )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गेवराई.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 27-11-2025 |
| Transcribed on | :- | 27-11-2025 |
| Checked & Signed on | :- | 27-11-2025 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer G-3, Georai.